आवक क्र. टिप्पणी व्हिसी
दिनांक–०३/०३/२०१०
जावक दिनांक

महाविद्यालय विद्यापीठ व विकास मंडळ
पुणे विद्यापीठ, पुणे ४११००७.
बी.सी.यू.डी/ओ.एस.डी./
दिनांक: ०३/०३/२०१०

मा. प्राचार्य/शैक्षणिक व संशोधन समन्वयक
संलग्न महाविद्यालय व संस्था

महोदय,

पुणे विद्यापीठाने २००६ मध्ये महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ विभागातर्फे महाविद्यालयीन व पुणे विद्यापीठातील प्राध्यापकांना संशोधनाकरिता प्रोत्साहन मिळावे म्हणून संशोधनाकरिता अनुदान देण्यास सुरुवात केली. केवळ आपल्या सहकार्यामुळे व वेळोवेळी केलेल्या मार्गदर्शनामुळे सदर योजनेस उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला आहे. आपणास विनित करण्यात येते की, आपण आपल्या महाविद्यालयास २००६ ते २००९ या शैक्षणिक वर्षात सदर योजनेअंतर्गत किती अनुदान मिळाले याची सविस्तर माहिती सोबतच्या तक्त्यात देण्यात यावी.

१. २००६ ते २००९ या कालावधीत अनुदान मिळालेल्या प्राध्यापकांची वर्षानुसार यादी व अनुदान रक्कम व सद्यस्थिती.

२. २००६, २००७, २००८ मध्ये अनुदान मिळालेल्या प्राध्यापकांपैकी किती प्राध्यापकांनी प्रोजेक्ट रिपोर्ट जमा केले, याची सविस्तर माहिती द्यावी.

३. जमा केलेल्या प्रोजेक्ट रिपोर्टची एक प्रत आपल्या महाविद्यालयातील शैक्षणिक व संशोधन समन्वयक यांच्या कडे जमा करावी.

४. आतापर्यंत दिलेल्या रक्कमेचे चेक क्रमांक व रक्कम (प्रत्येक प्राध्यापकांची) या विषयी माहिती द्यावी.

५. संशोधन करणाया प्राध्यापकांनी राष्ट्रीय /आंतरराष्ट्रीय संशोधन निबंध सादर केले असल्यास त्याची प्रत व अहवाल पाठवावा.

६. आपण स्वत: सदर योजनेबद्दल आपल्या महाविद्यातील सविस्तर अहवाल ग्रंथालय, प्रयोगशाळा, उपकरणे विचारात घेवून आपल्या शैक्षणिक व संशोधन समन्वयक यांच्या स्वाक्षरीने पाठवावा.

तरी कृपया योग्य ती माहिती महाविद्यालय व विद्यापीठ विकासमंडळ विभागास पाठवून सहकार्य करावे.

कळावे

डॉ. मोहन वामन
विशेष कार्याधिकारी, म.वि.वि.मं.

डॉ. पंडित विद्यासागर
संचालक, म.वि.वि.मं.

## Research Performance

Name of the college or institue
Name of the principle
Mobile No.

Name of the Research Co-ordinator
Mobile No.

| Sr.No. | Name of Principal Investigator | Title of the Project | sanctioned Year | Complete or incomplete (Date) | Amount Sanctioned | Amount received from University | Paper Presented or Published at National or International Level | Status Or Remarks |
|---|---|---|---|---|---|---|---|---|

Sign of Academic & Research Co-ordinator

Sign of principle